मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पैलवानाच्या नादाला लागयचं नसतं!

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा इशारा; अजित पवार 'स्क्रीप्ट'वर बोलू नका!

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांनी पत्रकार परिषद घेतली आणि स्क्रिप्ट'च्या आधारे एजन्सीच्या सल्ल्याने बिनबुडाचे आरोप केले. त्यांच्या काळात शहरात काय झाले आणि भाजपाच्या सत्ताकाळात काय विकासकामे केली हे आम्ही सांगतो. पण, "देवा शप्पथ सांगतो; पैलवानाच्या नादाला लागू नका.." असा इशारा भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव न घेता दिला आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक- 2026 च्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीने निगडी येथील भक्ती-शक्ती शिल्पाजवळ आयोजित कार्यक्रमात निवडणुकीच्या प्रचाराचा शुभरंभ केला. यावेळी चव्हाण बोलत होते. या प्रसंगी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महामंत्री राजेश पांडे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे यांच्यासह शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी भोसरी विधानसभेतील भरत लांडगे, शिवसेना उबाठा पिंपरी-चिंचवड शहर संघटक संतोष वाळके, उपविभाग प्रमुख अविनाश लोणारे, भाऊसाहेब काटे, भोसरी विधानसभा समन्वयक साईनाथ ढाकणे, मनोज परांडे, राजकुमार बांगर, शाखाप्रमुख प्रिमशिल पोटभरे, सचिन नायकुडे, सुभाष खेडकर, नवनाथ परांडे, पंडित वाळके, बापुशेठ परांडे, नितीन परांडे, पप्पु तुपे, चेतन कदम, संकेत परांडे, शुभम वाळके, ऋत्विक कदम, अमित सोरटे, सुदर्शन कदम, अजय काळे, प्रदीप परांडे, किरणशेठ वाळके, अजय परांडे, निलेश वाळके यांच्यासह राष्ट्रवादीचे अनवर शेख, गणेश सानप, संतोष फुंदे, रविंद्र राख, सरचिटणीस अजहर खान, सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष गंगाताई धेंडे, कायदा सेलचे ॲड. विशाल जाधव, ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष गणेश सस्ते, गणेश यादव, महिला आघाडीच्या शुभांगी जाधव आदींनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे.

### खोटा नॅरेटिव्ह करण्याचा प्रयत्न...

» रविंद्र चव्हाण म्हणाले की, भाजपाचा कार्यकर्ता कायम लोकांच्या सेवेत आहे. सेवेतून संघटन आम्ही पुढे नेत आहोत. केंद्र व राज्य सरकारने सातत्याने लोकहिताचे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे मोदी सरकार, फडणवीस सरकारला लोकप्रियता मिळाली आहे. लोकसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे खोटा नॅरेटिव्ह केला. तसा आता काहीलोक महापालिका निवडणुकीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. काही लोकांना एजन्सीज् स्क्रिफ्ट लिहून देतात. एजन्सीज भाड्याने घ्यायच्या आणि पैसा जक्कड आहे. त्यामुळे हजार-दोन हजार लोकांना कंपन्यांमध्ये बसवून ट्रोल करायला पैसे द्यायचे. मी किती पॉप्युलर आहे, हे दाखवण्यासाठी काहीपण करायला लोक तयार आहेत, असा घणाघातही चव्हाण यांनी केला.

"भारतीय जनता पार्टीची विचारधारा 'राष्ट्र प्रथम' म्हणून काम करीत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकांची दिशाभूल करणाऱ्यांना पिंपरी-चिंचवडकर भुलणार नाहीत. वर्षानुवर्षे त्यांनी केलेला कारभार पिंपरी-चिंचवडकरांनी पाहिला आहे. शहर स्मार्ट करण्यासाठी, मेट्रो सिटी घडवण्यासाठी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभा केले पाहिजे. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात याचा विचार केला नाही आणि आज वर तोंड करुन बोलत आहेत. हिंदुत्वाचं नाव घ्यायला घबारताहेत. हिंदुत्वाचे नाव घ्यायला अंगत रग लागते. ती भाजपाशिवाय कोणाकडेही नाही.

- रविंद्र चव्हाण, प्रदेशाध्यक्ष, भाजपा.

# सुरेश तात्या म्हेत्रे यांच्या रूपाने प्रभाग क्रमांक 1 मध्ये अनुभवी आणि सक्षम नेतृत्व

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक १ मध्ये आगामी काळातील विकासाचे व्हिजन पाहता, आमदार महेश दादा लांडगे यांचे कट्टर समर्थक सुरेश तात्या म्हेत्रे यांच्या नावाची जोरदार चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. एक अनुभवी, चारित्र्यसंपन्न आणि सुशिक्षित नेतृत्व म्हणून म्हेत्रे यांची ओळख असून, राजकारणात म्हेत्रे कुटुंबीयांचे नाव आदराने घेतले जाते.





त्यांचा दांडगा जनसंपर्क आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे प्रभागातील नागरिकांशी त्यांचे अतूट नाते निर्माण झाले आहे. आमदार महेश दादा लांडगे यांनी चिखली आणि परिसराचा कायापालट करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे.

सध्या या भागात पाच डीपी रस्त्यांचे काम प्रगतीपथावर सुरू असून चिखली जलशुद्धीकरण प्रकल्प, टाऊन हॉल, संतपीठ, शाळा आणि अंतर्गत रस्त्यांचे जाळे विणण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. प्रशासकीय कामांचा अनुभव आणि आमदारांशी असलेले निकटचे संबंध यामुळे प्रभागातील सोसायट्यांचे प्रश्न आणि इतर नागरी समस्या मार्गी लावण्यासाठी सुरेश तात्या म्हेत्रे हेच सक्षम पर्याय असल्याचे नागरिकांचे मत आहे.

प्रभाग क्रमांक १च्या सर्वांगीण विकासासाठी सुरेश तात्या म्हेत्रे यांच्यासारख्या अनुभवी नेतृत्वाची गरज असल्याची भावना जनमानसात उमटत आहे. म्हेत्रे यांच्या माध्यमातून आमदार महेश दादा लांडगे हे स्वतः प्रभागातील कामांमध्ये लक्ष घालून विकासकामांची गती कायम राखतील, असा विश्वास सध्या चिखली परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

# शिवसेना उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ

## शिवसेनेला विश्वासात घेतल्याशिवाय कोणाचाच महापौर होणार नाही; मंत्री उदय सामंत

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्रात, राज्यात सत्तेत एकत्र असल्याने भाजपसोबत युती करण्यासाठी प्रचंड मेहनत केली. शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. परंतु, ठीक आहे. त्यांनी गाफील ठेवले. युती केली नाही. शेवटच्या तासाभरात शिवसेनेला ताकदीचे ६१ उमेदवार मिळतील का असे त्यांना वाटले नसेल. पण, शिवसेनेला ताकदीचे उमेदवार मिळाले. त्यामुळे शिवसेनेला विश्वासात घेतल्याशिवाय कोणाचाच महापौर होऊ शकत नाही, असा विश्वास शिवसेना नेते, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला. प्रचारात टीका-टिप्पणी करण्यापेक्षा आपण काय कामे करणार आहोत. हे जनतेला सांगावे, असे आवाहनही त्यांनी केले.




यावेळी शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग बारणे, शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद, सुलभा उबाळे, महानगरप्रमुख राजेश वाबळे, जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, शहरप्रमुख नीलेश तरस, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्राचे सचिव विश्वजीत बारणे, बाळासाहेब वाल्हेकर, राजेंद्र तरस, जिल्हा संघटिका शिला भोंडवे उपस्थित होते.

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विरोधकांना भुईसपाट केले जाईल. अनेक उमेदवार नवीन आहेत. या उमेदवारांनी मतदारांच्या विश्वासाला पात्र ठरावे. समोरच्यावर टीका करु नये, कोणाची उणीदुणी काढू नये. आपण किती चांगले काम करणार आहोत, हे सांगावे. जनता टिका-टिप्पणीला कंटाळली आहे. कोणावरच टीका करायची नाही. टीका केल्याने मते वाढत नाहीत. नम्रतेने लोकांसमोर जावे.

पिंपरी-चिंचवडसाठी एकनाथ शिंदे यांचे मोठे योगदान आहे. शास्तीकर माफ करण्याचा निर्णय एकनाथ शिंदे यांनी केला. त्यामुळे त्याचे श्रेय कोणी घेऊ नये. शिवसेनेचे बरचेसे काम उपमुख्यमंत्री अजित पवार हलके करत आहेत. त्यामुळे चिंता करण्याचे काही कारण नाही. फक्त अजित पवार जे म्हणतील त्याला मम म्हणत जाऊ, आपण काही विकास कामे करणार आहोत, हे जनतेला सांगावे. शिवशक्ती विरुद्ध धनशक्तीची लढाई आहे. समोर धनाढ्य लोक आहेत. आपल्याकडे संघर्ष करणारा शिवसैनिक आहे. संघर्ष करणारा शिवसैनिक धनशक्तीला भुईसपाट करुन जिंकल्याचा इतिहास आहे. नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना महाराष्ट्राचा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला.

शिवसेनेच्या विश्वासघाताची ही निवडणूक आहे. समोरच्यांच्या भ्रष्टाचाराची आहे. त्यांच्या कारभाराला चपराक देणारी निवडणूक आहे. संघर्षशिवाय काहीच मिळत नाही. त्यामुळे शिवसेनेच्या उमेदवारांच्या नशिबी संघर्ष आला आहे. स्वबळावर लढत असलो, तरी एकनाथ शिंदे यांची पूर्ण ताकद सर्व उमेदवारांच्या पाठिशी आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना आणली आणि राबविली. पृथ्वी तलावर जोपर्यंत चंद्र आणि सुर्य आहे, तोपर्यंत ही योजना बंद होऊ शकणार नाही. आपण आपल्याला कमकूवत समजायचे नाही. समोरच्याला कमकूवत समजावे. आपले बरेचसे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्ण करणार आहे. आपल्याला फक्त लोकांपर्यंत पोहचावे. घरोघरी जाऊन प्रचार करावा. शेवटच्या तीन दिवसात दबाव, दादागिरीचे राजकारण केले जाऊ शकते. या सगळ्या गोष्टीसमोर छातीठोकपणे उभे रहावे. ज्यांना स्वतःच्या अस्तित्वाची पडली आहे, ते पत्रकार परिषद घेतात. टीका-टिप्पणी करतात. हा भानगडीत आपल्याला पडायचे नाही. आपण सोबत असतो, तर काही लोकांची ढाल बनलो असतो. पण, त्यांना आपण नकोच आहेत. त्यामुळे लाचारी करायची देखील काही गरज नव्हती. शिवसैनिकांना न्याय देण्याचा निर्णय घेतला असल्याचे सामंत म्हणाले.

# चिखलीच्या सर्वांगीण विकासासाठी गणेश मळेकर यांचे नेतृत्व सरस; प्रभाग क्रमांक 1 मध्ये भाजपचे पारडे जड

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १ मध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून, चिखली परिसरात आदराने नाव घेतले जाणाऱ्या मळेकर कुटुंबातील युवा नेतृत्व गणेश मळेकर यांच्या नावाची मोठी चर्चा रंगली आहे. चिखली, गावठाण, पाटील नगर, साने चौक, टॉवर लाईन, मेत्रे वस्ती, धर्मराज नगर, ताम्हणे वस्ती आणि सोनवणे वस्ती या संपूर्ण परिसरामध्ये दांडगा जनसंपर्क आणि विकासाची दूरदृष्टी असलेल्या मळेकर यांच्या पाठीशी नागरिक ठामपणे उभे असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.




चिखली परिसराचा चेहरामोहरा बदलण्यात मळेकर कुटुंबाचे योगदान ऐतिहासिक राहिले आहे. विशेषतः चिखली-आकुर्डी रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता, मात्र या विकासासाठी प्रशासनाला सर्वप्रथम सहकार्य करण्याचे धाडस गणेश मळेकर यांनी दाखवले. रस्ता रुंदीकरण आणि नियोजित डेव्हलपमेंटसाठी स्वतःहून 'अ-ब' पत्र प्रशासनाला देऊन त्यांनी विकासाचा मार्ग मोकळा केला. त्यांच्या या निर्णयामुळेच आज या भागातील वाहतुकीचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत झाली आहे. बांधकाम व्यवसायाचा प्रदीर्घ अनुभव असल्याने प्रभागाचा कायापालट नेमका कसा करावा, याचे सूक्ष्म नियोजन आणि कल्पकता त्यांच्याकडे आहे. केवळ रस्तेच नव्हे, तर नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि आरक्षित भूखंडांचा विकास कशा पद्धतीने करता येईल, याचे व्हिजन घेऊन ते मैदानात उतरले आहेत.

आमदार महेश दादा लांडगे यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे गणेश मळेकर यांनी पक्षासाठी नेहमीच प्रामाणिकपणे कार्य केले आहे. त्यांच्याकडे असलेल्या संघटन कौशल्यामुळे आज प्रभागात होतकरू तरुणांची मोठी फौज त्यांच्या पाठीशी उभी आहे. जो उमेदवार स्वतः त्या परिसरात राहतो आणि नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होतो, तोच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवू शकतो, असा विश्वास स्थानिकांमध्ये आहे. प्रभाग क्रमांक १ मधील भाजपचे सक्षम पॅनेल आणि मळेकर यांची कार्यपद्धती पाहता, या भागात पुन्हा एकदा कमळ फुलणार असल्याची खात्री नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

या संदर्भात आपली भूमिका मांडताना गणेश मळेकर म्हणाले की, चिखली परिसराचा विकास करणे हे आमचे ध्येय नसून ते आमचे कर्तव्य आहे. मळेकर कुटुंबाने नेहमीच समाजहिताला प्राधान्य दिले आहे आणि रस्ता रुंदीकरणासाठी आम्ही दिलेले सहकार्य हा त्याचाच एक भाग होता. आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही प्रभागातील प्रत्येक वस्तीपर्यंत मूलभूत सुविधा पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहोत. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून नव्हे, तर कायमस्वरूपी विकास आराखडा राबवून चिखलीचा कायापालट करण्याचा आमचा मानस आहे आणि नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद पाहता विजयाची खात्री आहे.

# ‘मविआ’त सावळागोंधळ! 45 जागांवर मित्रपक्षच एकमेकांना भिडणार

## काँग्रेसचे 96, शिवसेनेचे 78 तर मनसेचे 44 शिलेदार मैदानात; पुण्यातील 9 प्रभागांमध्ये महाविकास आघाडीतच जुंपणार.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीत एकूण १६५ जागांपैकी दोन जण बिनविरोध झाले. असे असताना महाविकास आघाडीने तब्बल २१० जणांना उमेदवारी दिली आहे. त्यांना एबी फॉर्महीं दिले आहेत. त्यामुळे तब्बल ४५ जागांवर मित्रपक्ष एकमेकांच्या समोर उभे ठाकल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ही सगळी आकडेवारी पाहता कोणत्या प्रभागात कोणी कोणी क्रॉस उमेदवार दिले आहेत, याची तपासणी पक्षातर्फे अजूनही केली जात असून, अर्ज मागे घेण्याची मुदतही संपली आहे.

महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, मनसे आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष हे तिघे आहेत. त्यात काँग्रेसने ९८ जागांवर उमेदवार दिले होते. त्यातील बिबवेवाडी आणि सिंहगड येथील प्रत्येकी अशा दोन उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे त्यांचे ९६ उमेदवार रिंगणात आहेत. मनसेने ४४ जणांना एबी फॉर्म दिले, तर ठाकरेंच्या शिवसेनेने तब्बल ७८ ठिकाणी उमेदवार दिले आहेत. या तिघांची बेरीज केली, तर ती २१० जागांची होती.

त्यामुळे उमेदवारीचे वाटप करताना काँग्रेस- शिवसेना आणि मनसे यांच्यातील समन्वय बिघडला आहे. ४१ पैकी जवळपास ९ प्रभागांमध्ये मैत्रीपूर्ण लढत होणार असून, आठ प्रभागांत काँग्रेस, तर चार प्रभागांत शिवसेनेचे आणि दोन प्रभागात मनसेचे चारही उमेदवारांचे चिन्ह एकच असणार आहे. ४१ पैकी ७ प्रभागांत १५ जागांवर आघाडीतील मित्रपक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढत होणार आहे.

काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आघाडीचा धर्म पाळत मनसेला घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेने आपल्या वाट्याच्या जागांतील काही मनसेला देण्याचा निर्णय घेतला. मात्र, प्रत्यक्षात तिन्ही पक्षांकडून वाटणीपेक्षा जादा एबी फॉर्मचे वाटप केले. त्यामुळे आघाडीत बिघाडी झाल्याचे दिसून आले. त्यानुसार नऊ प्रभागात काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि मनसेचे उमेदवार रिंगणात आल्याने तेथे मैत्रीपूर्ण लढत होणार आहे.

कोंढवा खुर्द-कौसरबाग (प्रभाग १९) येथे काँग्रेसने चारही उमेदवार रिंगणात उतरविले आहेत; परंतु त्याच प्रभागात आघाडीतील मित्रपक्ष असलेली शिवसेना-मनसे यांनी प्रत्येकी दोन उमेदवारांना संधी दिल्याने भाजप-शिंदे शिवसेनेबरोबरच आघाडीतील मित्रपक्षांशी काँग्रेसला लढत द्यावी लागणार आहे. ही परिस्थिती घोरपडेपेठ-समताभूमी (प्रभाग २६) मध्ये एकमेकांसमोर आल्याने मैत्रीपूर्ण लढत होणार आहे. महाविकास आघाडीने तब्बल २१० जणांना उमेदवारी दिली आहे. त्यांना एबी फॉर्मही दिले आहेत. त्यामुळे तब्बल ४५ जागांवर मित्रपक्ष एकमेकांच्या समोर उभे ठाकल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ही सगळी आकडेवारी पाहता कोणत्या प्रभागात कोणी कोणी क्रॉस उमेदवार दिले आहेत,




### जादा एबी फॉर्मचे वाटप

» काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आघाडीचा धर्म पाळत मनसेला घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेने आपल्या वाट्याच्या जागांतील काही मनसेला देण्याचा निर्णय घेतला. मात्र, प्रत्यक्षात तिन्ही पक्षांकडून वाटणीपेक्षा जादा एबी फॉर्मचे वाटप केले. त्यामुळे आघाडीत बिघाडी झाल्याचे दिसून आले. त्यानुसार नऊ प्रभागात काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि मनसेचे उमेदवार रिंगणात आल्याने तेथे मैत्रीपूर्ण लढत होणार आहे.

### येथे होणार मैत्रीपूर्ण लढती

» फुलेनगर-नागपूर चाळ (प्रभाग २) येथे प्रभाग ब वर्गात काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) यांचे उमेदवार एकमेकांसमोर आहेत, तर खराडी- वाघोली (प्रभाग ४) येथे ‘क’ गटात, कल्याणीनगर वडगाशेरी (प्रभाग ५) मध्ये ‘ब’ काँग्रेस आणि शिवसेनेचे उमेदवार रिंगणात आहेत. येरवडा- गांधीनगर (प्रभाग ६) मधील चारपैकी तिन्ही गटात काँग्रेस-शिवसेनेनेही उमेदवारी देऊ केल्याने तेथे मैत्रीपूर्ण लढत होणार आहे. कोंढवा खुर्द-कौसरबाग (प्रभाग १९) येथे काँग्रेसने चारही उमेदवार रिंगणात उतरविले आहेत; परंतु त्याच प्रभागात आघाडीतील मित्रपक्ष असलेली शिवसेना-मनसे यांनी प्रत्येकी दोन उमेदवारांना संधी दिल्याने भाजप-शिंदे शिवसेनेबरोबरच आघाडीतील मित्रपक्षांशी काँग्रेसला लढत द्यावी लागणार आहे. ही परिस्थिती घोरपडेपेठ-समताभूमी (प्रभाग २६) मध्ये एकमेकांसमोर आल्याने मैत्रीपूर्ण लढत होणार आहेत.

---

# शिवसेनेचे 118 उमेदवार रिंगणात! 63 महिलांना संधी; 9 जानेवारीला एकनाथ शिंदे प्रचाराला येणार

## भाजपशी युती व्हावी म्हणून, आम्ही सन्मानजनक 25 जागा मागितल्या. मात्र, युती झाली नसल्याने शिवसेनेचे 118 उमेदवार रिंगणात आहेत : डॉ. नीलम गोऱ्हे

**पुणे | प्रतिनिधी**

भाजपशी युती व्हावी म्हणून, आम्ही सन्मानजनक २५ जागा मागितल्या. मात्र, युती झाली नसल्याने शिवसेनेचे ११८ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात ६३ महिला आणि ५५ पुरूष उमेदवार असून १५ प्रभागात चार पॅनल उभे असल्याची माहिती शिवसेना नेत्या व विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रदेश युवासेना सचिव किरण साळी आणि उमेदवार उपस्थित होते..

युतीत मनभेद होवू नये यासाठी आम्ही स्वतंत्र निवडणूक लढवत आहे. कोणी सातत्याने बळाच चिथावणी दिली, तर त्याला शिवसेना बळी पडणार नाही, असे सांगून शिवसेना अवास्तव मागणी करत असल्याच्या केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या विधानावर मत व्यक्त करण्यास त्यांनी नकार दिला. ते महापौर होते आणि आजच्या शहराच्या स्थितीला ते किती जबाबदार आहेत, याचा त्यांनी विचार करावा असेही त्यांनी सूचवले.

एकीकडे युती धर्म म्हणायचे आणि आमचेच नगरसेवक पक्षात घेऊन त्या जागांवर दावा सांगायचा, हे बरोबर नाही. आम्हाला दातृत्वाची गरज नाही. आम्हाला योग्य सन्मान मिळाला नाही, अशी खंतही गोऱ्हे यांनी व्यक्त केली. युती केली किंवा नाही केली, यामुळे आम्ही लहान-मोठे ठरत नाही. जनता जर्नादन आम्हाला काय विश्वास देतय, यावर आमचे समाजामधील स्थान ठरते, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार विजय शिवतारे, सहसंपर्क प्रमुख अजय भोसले, पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे, माजी आमदार रविंद्र धंगेकर, युवासेना प्रदेश सचिव किरण साळी आदी उपस्थित राहणार आहेत. ९ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुण्यात प्रचारासाठी येणार आहेत.



### प्रचाराचा प्रारंभ

» सर्व उमेदवारांच्या प्रचार अभियानाचा प्रारंभ उद्या, शनिवारी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थित ग्रामदैवत कसबा गणपती आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची आरती करून होईल. यावेळी शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार विजय शिवतारे, सहसंपर्क प्रमुख अजय भोसले, पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे, माजी आमदार रविंद्र धंगेकर, युवासेना प्रदेश सचिव किरण साळी आदी उपस्थित राहणार आहेत. ९ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुण्यात प्रचारासाठी येणार आहेत.

# हिंजेवाडी आयटी कर्मचाऱ्यांना नववर्षाच्या सुरुवातीलाच मोठा दिलासा

## गणेश खिंड रस्त्यावर आचार्य आनंदऋषीजी चौकामधील एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे (डबलडेकर) काम अंतिम टप्प्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

गणेश खिंड रस्त्यावर आचार्य आनंदऋषीजी चौकामधील एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे (डबलडेकर) काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या महिनाभरात हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून वाहतूक कोंडीचा मनस्ताप सहन करत प्रवास करणाऱ्यांना प्रामुख्याने पुणे शहरातून हिंजेवाडी आयटी कंपनीत ये – जा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नववर्षाच्या सुरुवातीला मोठा दिलासा मिळणार आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून आनंदऋषीजी चौकात दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येत आहे. या उड्डाणपुलाच्या पहिल्या स्तरावर दुहेरी वाहतूक, तर वरच्या स्तरावर मेट्रो मार्गाचे नियोजन आहे. औंध ते शिवाजीनगर या दिशेने येणाऱ्या बाजूचे काम पूर्ण झाल्याने २० ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. ही बाजू वाहनचालकांसाठी खुली करण्यात आली. मात्र, याच उड्डाणपूल प्रकल्पातील बाणेर, पाषाणकडील दोन बाजूंची कामे प्रलंबित आहेत. ही कामे अंतिम टप्प्यात असून, येत्या महिनाभरात बाणेर आणि पाषाण मार्गाच्या दिशेने जाणारे मार्ग खुले करण्यात येणार आहे. त्यामुळे शिवाजीनगरहून औंध, बाणेर आणि पाषाणकडे जाणाऱ्या प्रवाशांना गेल्या अनेक दिवसांपासून वाहतूक कोंडीचा सामाना करत असलेल्या वाहनचालकांचा त्रास कमी होणार आहे.

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेचा बाणेरपर्यंतचा टप्पा दिवाळीपूर्वी सुरू करावा, अशी मागणी शहरातील आयटी कर्मचाऱ्यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) केली आहे. हिंजवडीतील आयटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेने 'फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज'च्या माध्यमातून पत्राद्वारे ही विनंती केली गेली. परंतु पीएमआरडीए कडून मार्च २०२६ मध्ये संपूर्ण मार्गावर मेट्रो धावणार असे सांगण्यात आले. हिंजवडी ते बाणेर मेट्रो टप्प्याची वेळेत सुरूवात केल्यास शहरातील आयटी कर्मचाऱ्यांचे प्रवास सुखकर होईल. वाहतूक कोंडी कमी होणे, वेळेची बचत आणि दिवाळी–नाताळच्या निमित्ताने कामगारांना दिलासा मिळेल या सगळ्याच बाबतीत हा प्रकल्प शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरेल. बाणेरपर्यंत मेट्रो सुरू झाल्यास प्रवाशांचे वेळ व प्रवासाचे तास वाचणार आहेत, ज्यामुळे दैनंदिन जीवनावर थेट सकारात्मक परिणाम होईल.



### प्रमुख वैशिष्ट्ये

» विद्यापीठ चौकात वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी ५५ मीटर लांब स्टील गर्डर बसविण्यात आला आहे. त्याचबरोबर उड्डाणपुलाच्या सुरुवातीच्या आराखड्यात सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूक या पुलाला जोडण्यात आली आहे. तसेच, सेनापती बापट रस्त्यावरून बाणेर आणि पाषाणकडे जाण्यासाठी उड्डाणपुलाला दोन मार्गिका रॅम्पद्वारे जोडण्यात आल्या आहेत.

### प्रकल्प आढावा

» एकूण लांबी – १७६३.५२ मीटर
» औंध – शिवाजीनगर लांबी – १३००.०० मीटर
» शिवाजीनगर ते बाणेर बाजूकडील उड्डाणपुलाचे डांबरीकरणाचे काम पूर्ण
» शिवाजीनगर बाजूकडील व बाणेरबाजूकडील रॅम्पचे काम अंतिम टप्प्यात

> “गणेशखिंड रस्त्यावीरल वाहूतक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या दुमजली उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या महिनाभरात शिवाजीनगरकडून बाणेर, पाषाणकडे जाणारी पुलाची बाजू वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार आहे. हा पूल सुरू करण्यात येणार असल्याने परिसरातील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.
>
> \- रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए

# वढू बुद्रुक येथील समाधी स्थळाचा मार्ग मोकळा; केईएमची जमीन होणार हस्तांतरित

## स्मारकाच्या परिसरात 'अदृश्य शिल्प' ठरणार आकर्षणाचे केंद्र; मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने कामाला वेग.

**पुणे | प्रतिनिधी**

स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या वढू बुद्रुक (ता. शिरूर) येथील समाधी स्थळाच्या विकासासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने, के.ई.एम. रुग्णालयाच्या मालकीची वढू बुद्रुक येथील जमीन आता समाधीस्थळसाठी उपलब्ध होणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर हा निर्णय घेण्यात आला.

विशेष म्हणजे, पुणे जिल्ह्यातील तुळापूर व वढू बुद्रुक येथील विकास आराखड्यात ग्रामस्थांच्या सूचना लक्षात घेण्यात याव्यात, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्वीच जाहीर केले आहे. या दोन्ही स्थळांच्या विकासासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ५३२.५१ कोटी किमतीच्या विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास सांगणारे अत्याधुनिक संग्रहालय आणि ऐतिहासिक संदर्भांनी समृद्ध ग्रंथालय उभारले जाणार आहे.

८२ आसन क्षमतेचे एक अत्याधुनिक सभागृह असेल, जिथे १०-डी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक चित्रफित दाखवली जाईल. स्मारकाच्या परिसरात एक वैशिष्ट्यपूर्ण'अदृश्य शिल्प'(इन्व्हिझिबल स्कल्पचर) उभारले जाणार आहे. भीमा नदीच्या काठी १२० मीटर लांबीचा घाट बांधला जाणार आहे शासनाने के.ई.एम. रुग्णालयाला कोंढापुरी (ता. शिरूर) येथील गट नं. कोंढापुरी येथील जमीन रुग्णालयाला 'विशेष बाब' म्हणून महसूलमुक्त आणि भोगवटामूल्यरहित उपलब्ध करून देण्यात आली आहे. या जमिनीचा वापर केवळ मंजूर वैद्यकीय प्रयोजनासाठीच करणे बंधनकारक असून, तीन वर्षांच्या आत तिथे काम सुरू करावे लागेल.. के.ई.एम. रुग्णालयाच्या मालकीची वढू बुद्रुक येथील जमीन आता समाधीस्थळसाठी उपलब्ध होणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर हा निर्णय घेण्यात आला.



### केईएमला कोंढापुरी येथील जागा

» महसूल विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, के.ई.एम. रुग्णालयाची वढू बुद्रुक येथील गट नं. ४४७ आणि ४४८ मधील एकूण ०.८७ हेक्टर २० आर जमीन छत्रपती संभाजी महाराज समाधी स्थळाच्या कामासाठी तत्काळ हस्तांतरित केली जाणार आहे. या बदल्यात, शासनाने के.ई.एम. रुग्णालयाला कोंढापुरी (ता. शिरूर) येथील गट नं. ६५५ मधील ०.८१ आर जमीन 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून कब्जा हक्काने प्रदान करण्यास मंजुरी दिली आहे.